| | |
|---|---|
| MHSN080016172019 | दाखल तारीख – ०६.१२.२०१९<br>नोंदणी तारीख – ०६.१२.२०१९<br>निकाल तारीख – ०७.०४.२०२६<br>कालावधी – वर्षे – महिने – दिवस<br>०६ ०४ ०१ |

**<u>जत येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय,</u>**
**(पिठासीन अधिकारी प्रकाश चु. बछले)**

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.३२१/२०१९</u>**
**<u>निशाणी क्र.२८</u>**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>जत पोलीस ठाणे. |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. अ. व. विरकर<br>सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| | | |
| आरोपी | **१.**<br><br>**२.**<br><br>**३.**<br><br><br>**४.** | **बिरा कृष्णा बंडगर,**<br>वय–३१ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**बिरा तुकाराम खांडेकर,**<br>वय–२७ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**नाना बाळु खांडेकर,**<br>वय–४५ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>तिघे रा. बिरनाळ, ता. जत, जि. सांगली.<br>**मुरा शिवाजी पडोळकर,**<br>वय–२८ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>रा. कंठी, ता. जत, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे वकील | | श्री. आर. डी. कदम. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | – | ०२.१२.२०१८ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | – | ३६२/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | – | ०३.१२.२०१८ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | – | ०६.१२.२०१९ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | – | २६.०४.२०२३ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | – | २०.०१.२०२६ |
| युक्तिवाद दिनांक | – | ०७.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | – | ०७.०४.२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | – | ---- |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र. सं.कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बिरा कृष्णा बंडगर | दि.०७.०१.१९ रोजी फौ.प्र.सं.४१ (अ)१ अन्वये नोटीस | २६.०४.२०२३ | भा.दं.वि.स. कलम ३२३, ३२४,५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| २. | बिरा तुकाराम खांडेकर | दि.०७.०१.१९ रोजी फौ.प्र.सं.४१ (अ)१ अन्वये | २६.०४.२०२३ | | निर्दोष मुक्तता | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोटीस | | | | | |
| ३. | नाना बाळु खांडेकर | दि.०७.०१.१९ रोजी फौ.प्र.सं.४१ (अ)१ अन्वये नोटीस | २६.०४.२०२३ | भा.दं.वि.स. कलम ३२३, ३२४,५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| ४. | मुरा शिवाजी पडोळकर | दि.०७.०१.१९ रोजी फौ.प्र.सं.४१ (अ)१ अन्वये नोटीस | २६.०४.२०२३ | | निर्दोष मुक्तता | --- | --- |

**भाग क**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | प्रकाश पांडुरंग वाघमोडे | फिर्यादी तथा प्रत्यक्षदर्शी जखमी साक्षीदार |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | — | — |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असेल तर**

| अ नं. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| — | — | — |

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्ष**

| **अ नं.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | — | — |

**ब. बचाव**

| अ नं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| --- | -- | -- |

**क.न्यायालयीन निशाणी**

| अ नं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २५ | जखमी प्रकाश यांचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| २. | २६ | घटनास्थळ कम मुद्देमाल जप्ती पंचनामा |

**ड. भौतिक वस्तु**

| अ नं. | वस्तु क्र. | वर्णन |
|---|---|---|
| --- | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक ११.०३.२०२६)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता १८६० (येथून पुढे संक्षिप्तपणे भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२३,३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढीलप्रमाणे –**

**२.** फिर्यादी प्रकाश पांडुरंग वाघमोडे हे मौजे बिरनाळ, ता. जत येथे त्यांचे कुटुंबासमवेत रहात होते. दिनांक ०२.१२.२०१८ रोजी सायंकाळी ०८.३० ते ०९.०० चे दरम्यान फिर्यादी हे आरोपी क्र.१ यांच्याकडे जे.सी.बी. चे भाडे मागणेकरिता गेले होते. त्यावेळी आरोपी क्र.१ यांनी त्यांचेकडे पैसे नसल्यामुळे त्यांचे दूधचे फॅट मोजण्याचे मशीन घेवून जाणेबाबत तसेच पैसे दिल्यानंतर सदरची मशीन परत आणून देणेबाबत फिर्यादी यांना सांगितले. त्यामुळे, फिर्यादी यांनी सदरची मशीन घरी आणली. त्यानंतर रात्री

१०.३० चे सुमारास फिर्यादी यांचा स्वतःचा उस भरणेकामी ते ट्रॅक्टर घेवून बिरनाळ येथे इतर सहकार्यासमवेत गेले. तेथे उस भरत असताना आरोपी क्र.१ ते ४ हे तेथे काठया घेवून आले व शिवीगाळ करत त्यांनी फिर्यादी यांना मारहाण करणेस सुरुवात केली. आरोपी क्र.३ यांनी काठीने फिर्यादीच्या डोकीत, आरोपी क्र.४ यांनी फिर्यादीच्या डाव्या पायावर, आरोपी क्र.१ यांनी डाव्या हातावर तर आरोपी क्र.२ यांनी फिर्यादी यांच्या उजवे पायावर मारुन त्यांना गंभीर जखमी केले. तेथील कामगारांनी सोडवासोडव केली. त्यानंतर फिर्यादी यांचे वडील तेथे आले व त्यांनी फिर्यादी यांना जत पोलीस ठाणेत तक्रार देणेकरिता घेवून गेले. तेथील पोलीसांनी त्यांना दवाखाना यादी दिली व जत येथे उपचाराकरिता पाठविले. तेथील डॉक्टरांनी तपासून पुढील उपचाराकरिता सिव्हील हॉस्पीटल, मिरज येथे पाठविण्यात आले. तेथे उपचार घेतल्यानंतर फिर्यादी यांनी जत पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. म्हणून आरोपी विरुध्द भा.द.वि.कलम ३२३,३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद करणेत आला.

३. सदर गुन्ह्याचा तपास श्री. एस.जी.माने, पो.ना.कॉ.ब.क्र.३००, जत पोलीस ठाणे यांनी केला. त्यांनी आरोपींना नोटीस दिली. गुन्हयामध्ये वापरणेत आलेला मुद्देमाल जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळ कम मुद्देमाल जप्तीचा पंचनामा केला. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. निशाणी क्र.१४ कडे भा.द.वि.कलम ३२३,३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये आरोपीवर दोषारोप ठेवणेत आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची संमत्ती दर्शविली. गुन्हयामध्ये गोवविण्याइतपत पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

४. प्रस्तुत प्रकरणातील सारांश तसेच अभिलेखावर दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकीलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत–

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२.१२.२०१८ रोजी रात्री २२.३० वा. चे सुमारास संभाजी मानसिंग भोसले यांचे मौजे बिरनाळ, ता. जत येथील उसाचे शेतात आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना काठीने मारहाण करून ऐच्छीक दुखापत पोहोचवली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ३. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून त्यांचा अपमान करून ते सार्वजनिक शांततेचा भंग करतील असे प्रक्षोभन दिले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | नाही. |
| ४. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस दमदाटी करून भा.द.वि.सं. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षदर्शी

जखमी साक्षीदार फिर्यादी प्रकाश पांडुरंग वाघमोडे यांना नि.२२ कडे तपासलेले आहे. जखमी प्रकाश यांचे वैदयकीय प्रमाणपत्र व घटनास्थळ कम मुद्देमाल जप्ती पंचनामा इ. कागदपत्रे आरोपींनी मान्य केली असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.२५ व २६ देण्यात आली.

**<u>विचाराधीन बाबी क्र.१ ते ४ बाबत</u>:–**

६. विचाराधीन बाबी क्र.१ ते ४ या एकमेकांशी निगडीत असल्याने व समान पुराव्यावरच अवलंबून असल्याने उपलब्ध असलेल्या पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व विचाराधीन बाबींचे विवेचन एकत्रीत केलेले आहे.

७. आरोपी विरुध्द गुन्हा शाबीतीकरिता अभियोग पक्षाने जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार प्रकाश यांना नि.२२ कडे तपासलेले आहे. त्यांच्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले की, सन २०१९ च्या दरम्यान घटना घडली होती. त्यांची आरोपी सोबत किरकोळ वादावादी झाली होती. त्याव्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. त्यामुळे, त्यांनी फिर्याद दिली होती. फिर्याद व पहिली छापील खबर यावर त्यांच्या सहया असून त्यातील मजकूर त्यांना माहीत नाही. अशाप्रकारे साक्षीदारास घटनेसंदर्भात सांगता आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर साक्षीदाराला अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन त्याचा विस्तृत उलटतपास घेतला. परंतु, अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. याउलट, आरोपी विरुध्द त्यांचा कोणताही वाद राहिला नसल्याची वस्तुस्थिती त्यांनी उलटतपासादरम्यान मान्य केलेली आहे. आरोपींनी त्यांना मारहाण, दमदाटी व शिवीगाळ केल्याचे फिर्यादी यांनी स्पष्टपणे नाकारलेले आहे.

८. प्रस्तुत केसमधील फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.२० कडे अर्ज सादर करुन त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे कथन केले. परंतु भा.द.वि.कलम ३२४ हा गुन्हा तडजोड पात्र नसलेने सदरचा अर्ज नामंजूर करणेत आला. फिर्यादी व आरोपी यांची

संयुक्त तडजोड पुरशिस नि.२१ कडे दाखल आहे.

९. एकंदरीत अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला पुरावा विचारात घेता, ज्या व्यक्तीला मारहाण केल्यामुळे दुखापत झालेली आहे ती व्यक्तीच जर आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये काहीही सांगत नसेल तर फिर्याद भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे शाबीत झाली असे म्हणता येणार नाही. त्याचबरोबर आरोपीने घटनास्थळ कम मुद्देमाल जप्ती पंचनामा मान्य केला असल्यामुळे घटना संभाजी मानसिंग भोसले यांचे शेतात बिरनाळ, ता. जत येथे घडली होती असे म्हणता येईल. तसेच आरोपीतर्फे जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र देखील मान्य करण्यात आलेले आहे. तथापी, सदर प्रमाणपत्रामध्ये नमूद करणेत आलेल्या जखमा या आरोपींच्या मारहाणीमुळे झाल्या ही बाब शाबीत झालेली नाही. फिर्यादी यांनी अभियोग पक्षास सबळ पुरावा अभिलेखावर आणणेकरिता कोणत्याही प्रकारे सहाय्य केलेले नाही. त्यामुळे, फिर्यादी यांना केलेल्या शिवीगाळ, दमदाटी व मारहाणीची जबाबदारी आरोपीवर टाकता येवू शकत नाही.

१०. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरुन असे दिसते की, आरोपींवर भा.द.वि.कलम ३२३,३२४,५०४,५०६ सह कलम ३४ अन्वये निश्चित करण्यात आलेले दोषारोप हे अभियोग पक्ष यांना संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयश आलेले आहे. तसेच आरोपी विरुध्द कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सदरची बाब विचारात घेता, आरोपी हे पुरेशा पुराव्या अभावी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतात. म्हणून, मी विचाराधीन बाब क्र.१ ते ४ ची उत्तरे नकारार्थी नोंदवून विचाराधीन बाब क्र.५ करिता खालीप्रमाणे आदेश पारित करीत आहे.,

## आदेश

**१.** आरोपी क्र.१ बिरा कृष्णा बंडगर, आरोपी क्र.२ बिरा तुकाराम खांडेकर, आरोपी क्र.३ नाना बाळु खांडेकर व आरोपी क्र.४ मुरा शिवाजी पडोळकर यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये

भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३२३,३२४,५०४,५०६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. आरोपींचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. जप्त करण्यात आलेल्या ४ काठया मुल्यहिन असल्यामुळे त्या आव्हान कालावधीनंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ अन्वये नष्ट करणेत याव्यात.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) चे तरतुदीची पुर्तता करणेसाठी आरोपींनी प्रत्येकी रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र पुढील सहा महिन्याकरिता दयावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये पारित करणेत आला.)

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.04.07 17:10:18 +0530

दिनांक –०७.०४.२०२६
जत.

**(प्रकाश चु. बछले)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जत.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R. B. Samalewale, Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C., Jath |
| Date | : | 07.04.2026 |
| the Presiding Officer on. | : | 07.04.2026 |
| Order uploaded on. | : | 07.04.2026 |